AstroUttam

सिद्धांत संहिताहोरा रूपं स्कंद त्रयात्मकम ! वेदस्य निर्मलं चक्षु ज्योती:शास्त्र मनुत्तमम !!

शिवजयंती – तारीख की तिथी

uttam239 मार्च 26, 2016

Astro, astrologer in belgaum, Astrology, Astrology Course In Belgaum, Astrouttam, ज्योतिष, ज्योतिष ब्लॉग, ज्योतिषविद्या, ज्योतिषशास्त्र, देव, धर्मशास्त्र, भारतीय ज्योतिष, भारतीय पंचांग, भारतीय सण, मराठी ज्योतिष ब्लॉग, मराठी ज्योतिष blog, वैदिक ज्योतिष, शिवजयंती, शिवजयंती तारीख तिथी वाद, शिवजी महाराज जन्म तारीख,, शिवजी महाराज जन्म तिथी, शिवाजी महाराज जन्म कुंडली, शिवाजी महाराज जन्म कुंडली,, शिवाजी महाराज जन्म तारीख, शिवाजी महाराज जन्म तिथी, शिवाजी महाराज जन्म तिथी प्रमाणे, शिवाजी महाराज जन्म पत्रिका, शिवाजी महाराज जन्म वेळ, हिंदू कालगणना, हिंदू देवता, हिंदू धर्म, हिंदू पंचांग, हिंदू परंपरा, हिंदू संस्कृती, हिंदू सण, horoscope of shivaji maharaj, indian panchang, jyotiSh, KP Astrology, uttam gawade, uttam gawade blog, Vastu Class in Belgaum, vastu expert in Belgaum, vedic panchang

Edit

शिवजयंतीच्या तारखेविषयी अनेक वाद व गोंधळ घातले गेले आहेत, मागील शतकभर हा वाद सुरु होता अखेर महाराष्ट्र शासनाने एक समिती स्थापून १९ फेब्रुवारी १६३० ही इंग्रजी तारिख निश्चित केली. पण यात एक मुलभुत त्रुटि राहीली. ही तारीख ज्युलिअन कॅलेंडरप्रमाणे होती. आणि सध्या आपण जे कॅलेंडर वापरतो ते ग्रेगेरिअन कॅलेंडर आहे.



Shivaji maharaj

"शालिवहन शके १५५१ शुक्ल नाम संवत्सरी, उत्तरायणात, शिशिर ऋतूमध्ये फाल्गुन वद्य (कृष्ण) तृतियेला संध्याकाळी शुभ लग्न उदित" असता छत्रपती शिवाजी माहाराजांचा जन्म झाल्याचे "शिवभारत"च्या ६ व्या अध्यायात म्हटले आहे. याच जन्म विवरणची एक जन्म पत्रिकाही उपलब्ध आहे. जन्म वेळ ३० घटी (संध्या. ७.००) आहेत.



जोधपूर येथे उपलब्ध झालेली
महाराजांची जन्मकुंडली.



भूबाणप्राणचन्द्राब्दैः सम्मिते शालिवाहने ।
शके संवत्सरे शुक्ले प्रवृत्तेचोत्तरायणे ॥ २६ ॥
शिशिरर्तौ वर्तमाने प्रशस्ते मासि फाल्गुने ।
कृष्णपक्षे तृतीयायां निशि लग्ने सुशोभने ॥ २७ ॥
अनुकूलतरैस्तुंगसंश्रयैः पञ्चभिर्ग्रहैः ।
व्यंजिताशेषजगतीस्थिरसाम्राज्यवैभवम् ॥ २८ ॥

त्यानुसार सिंह लग्न व कन्या रास येते व चंद्राधियोग हा राजयोग झाला आहे. तृतियात (पराक्रम स्थान) उच्च शनि, पंचमात केतू, सप्तमात रवि–गुरु, अष्टमात बुध, नवमात शुक्र व लाभात मंगळ– राहु आहेत. आता हि सर्व ग्रहस्थिती १९ फेब्रुवारी १६३० या तारखेशी मेळ खात नाही.

फाल्गुन वद्य तृतिया हि तिथी तर निश्चित आहे, पण भारतीय पंचांगानुसार १९ फेब्रुवारीला फाल्गुन वद्य तृतिया येऊ शकत नाही. मग या फरकाचे कारण काय? तर याचे कारण म्हाणजे ज्युलियन व ग्रेगेरिअन कालगणनेतील फरक. १९ फेब्रुवारी ही ज्युलिअन कालगणनेनुसारची तारीख आहे जी कालगणना आता वापरात नाही, सध्या जगभरात ग्रेगेरिअन कालगणना वापरली जाते त्यानुसार फाल्गुन वद्य तृतिया शके १५५१ यादिवशी १ मार्च १६३० हा दिवस येतो. ज्युलियन कालगणना व ग्रेगेरिअन कालगणना यांच्यात इ.स. १७०० पर्यंत १० दिवस अधिक केले गेले तर इ.स. १७०० नंतर ११ दिवस अधिक केले गेले, हा फरक ब्रिटीशांनी इ.स. १७५२ पासून अंमलात आणण्यास सुरवात केली व भारतातही तेंव्हापासूनच लागू झाला. म्हणून शिवाजी महाराजांची जन्म तारीख ग्रेगेरिअन कालगणनेनुसार (आताच्या चालू कालगणनेनुसार) १ मार्च येईल, १९ फेब्रुवारी नव्हे.

September 1752

Su	M	Tu	W	Th	F	Sa
-	-	1	2	14	15	16
17	18	19	20	21	22	23
24	25	26	27	28	29	30

Astrouttam

महापुरुषांचे जन्मोत्सव तिथि प्रमाणे साजरे करावे की तारखे प्रमाणे हा अनेक वर्षापासूनचा वाद आहे. *आता तारखेतही असे घोळ असतील व तिथि निश्चित असेल तर तिथिप्रमाणेच साजरे करण्यास काय हरकत आहे?*. तसेही कॅलेंडर भारतात प्रचलित होण्यापुर्वीच्या घटना तिथि प्रमाणेच साजऱ्या करणे हेच योग्य वाटते. आता श्रेय लाटण्यासारखे तुच्छ राजकारण बाजूला ठेवल्यास बरे होईल.

हे सर्व लिहिण्याचे कारण जुन्या कडिला ऊत आणण्याचे नसून ज्या शिवरायानी स्वराज्य स्थापन केले, जे शिवराज आज साडेतिनशे वर्षानंतरही आम्हास प्रेरणा देतात त्या शिवराजांची अचूक जन्म तारीख जाणून घेणे इतकेच आहे.

एका ज्योतिषीय Software मध्ये पत्रिका बनविली आहे ती शिवभारत मध्ये दिलेल्या पत्रिकेशी तंतोतन्त जुळते आहे. जन्म तारीख ०१ मार्च १६३०, जन्मवेळ- संध्याकाळी ७.०० वाजता (३० घटी), जन्म स्थळ शिवनेरी पुणे. (अक्षांश -१९अं २१ मि. उत्तर, रेखांश – ७३ अं ५३ मि. पूर्व) येथे रामण अयनांश वापरले आहेत.



Shivaji maharaj Kundali

या विषयी काही मंडळींचे असे मत आहे की भारतीय कालगणना केवळ भारतातच प्रचलीत आहे व इंग्रजी कॅलेंडर जगभर म्हणून शिवाजी महाराजांना “ग्लोबलाइज” करण्यासाठी इंग्रजी तारखेप्रमाणेच साजरी करावी. मग उद्या आखाती देशात शिवाजी महाराज पोहचावे म्हणून “हिजरी” सनाप्रमाणे शिवजयंती साजरी करणार का?

आता इतके स्पष्ट करूनही बरेच लोक तारखेचाच अट्टाहास धरतील व इतरांनीही तारखे प्रमाणेच शिवजयंती साजरी करावी असे म्हणतील, त्यांना मी इतकेच म्हणेन कि, *ज्या लोकांनां शिवाजी महाराज हे देवतुल्य वाटतात त्यांनी तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी करावी व ज्यांना ते सामान्य मनुष्य वाटतात त्यांनी तारखेप्रमाणे शिवजयंती साजरी करावी बस्स.* कारण देवादिकांच्या सर्वच जयंत्या तसेच आपले सण आपण तिथीप्रमाणेच साजरे करतो ना . आज ऑस्ट्रेलिया, युरोप – अमेरिकेत आमचे गणपती, दिवाळी सारखे सॅन साजरे होतातच ना ? ते हि तिथीप्रमाणेच. मग शिवजयंती का होणार नाही ?

अर्थात हे माझे मत आहे.

————————————————————————

श्री उत्तम रमेश गावडे

ज्योतिष विशारद, वास्तु विशारद

9901287974